# देवाने आपल्या भूमीला का बरे करावे?

लेखक: रेव्ह. जॉयसन. के. सी.
भाषांतर: मनीष चांदेकर
एआयएम मॅगझीन, मे 2020 मध्ये प्रकाशित

आम्हाला आमचे राष्ट्रगीत गायला आवडते आणि आम्हाला त्याचा अभिमान आहे. जेव्हा जेव्हा मी हे गीत ऐकतो तेव्हा माझे हृदय आनंदाने उडी घेते. हे गीत श्री. रविंद्रनाथ टागोर, भारताचे साहित्यिक दिग्गज, यांनी लिहिले आहे. मला आमच्या गीताचे काही शब्द वाचू द्या आणि त्याचा अर्थ आठवू द्या:

*जन-गण-मन अधिनायक जय हे,*
*भारत भाग्य विधाता!*
तु लोकांच्या मनाचा शासक आहेस,
विजय तुझ्या बरोबर असो,
भारताच्या नियतीचा वितरक

तब शुभ नामे जागे,
तब शुभ आशिष मांगे
गाहे तब जय गाथा।
तुझे नाव ऐकून जागृत होतो आणि तुझ्या आशीर्वादासाठी प्रार्थना करतो,
सर्व लोकांचा बचाव तुझ्या हातात आहे.

*जन-गण-मंगलदायक जय हे,*
*भारत भाग्य विधाता!*
लोकांचे कल्याण करणारा तूच आहेस
भारताच्या नियतीचा वितरक

हेच ख्रिस्ती लोक भारतासाठी प्रार्थना करतात. आम्ही विश्वाच्या शासकाला प्रार्थना करतो - जो भारताच्या नियतीचा वितरक आहे. आम्ही परमेश्वराच्या आशीर्वादासाठी प्रार्थना करतो. प्रार्थना करतो की येशू ख्रिस्त लोकांचे रक्षण करो. आम्ही प्रार्थना करतो की देव आपल्या देशाला सुरक्षित राखो, आपल्या प्रिय देशाच्या नियतीचा तो वितरक आहे.

पण देवाने आपली प्रार्थना का ऐकली पाहिजे? आपला वंश इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे का? आपल्याकडे इतरांपेक्षा जास्त बुद्धिमत्ता आहे का? आपण इतरांपेक्षा नैतिकदृष्ट्या चांगले आहोत का?

असे प्रश्न दुसऱ्या विश्वयुध्दात डॉ. पीटर मार्शल यांनी अमेरिकन लोकांना विचारले होते आपल्या संदेशातून, “देवाने अमेरिकेला आशीर्वाद का द्यावा?”

आपण युद्धाला तोंड देत नाही आहोत परंतु जागतिक स्तरावर आजारपणाचा सामना करीत आहोत. ज्याचा परिणाम दुसऱ्या महायुद्धापेक्षा अधिक राष्ट्रांना आणि जास्त लोकांना होत आहे. आणि हे प्रश्न आज भारतातील चर्चला समर्पक आहेत. खरं तर ते आज कोणत्याही देशातील चर्चला समर्पक आहेत. पुढील विचारांबद्दल मी डॉ. पीटर मार्शलचे ऋणी आहे.

देवाने आपली प्रार्थना का ऐकावी? देवाने आमच्या आरोळींना उत्तर का द्यावे? देवाने भारतावर करुणापूर्वक का पाहिले पाहिजे? देवाने आपल्या जमीनीला आरोग्य का दिले पाहिजे?
किंवा गर्वामुळे आम्ही असा विचार करू लागलो आहोत की आम्ही देवाच्या आरोग्यासाठी पात्र आहोत.

आपण आपले लक्ष वळवूया 2 इतिहास 7:14
*तर माझे नाम ज्यास दिले आहे त्या माझ्या लोकांनी दीन होऊन माझी प्रार्थना केली आणि माझ्या दर्शना साठी उत्सुक होऊन ते आपल्या दुष्ट मार्गांपासून परावृत्त झाले तर मी स्वर्गातून त्यांची विनंती ऐकून त्यांच्या पापांची त्यास क्षमा करीन व त्यांच्या देशातून क्लेश नाहीसे करीन.*

आज हे शास्त्रवचन आपल्या राष्ट्रातील लोकांसमोर आणलं जाणारे एक महत्त्वाचे शास्त्रवचन आहे. खरे तर - कोणतीही प्रादेशिक निष्ठा विचारात न घेता हे आवाहन सर्व भारतीयांसाठी आहे.

कारण आपण गीत म्हणतो:

*पंजाब-सिन्ध-गुजरात-मराठा,*
*द्रविड-उत्कल-बङ्ग*
*विंध्य हिमाचल यमुना गंगा*

पंजाब, सिंध, गुजरात, मराठा, द्रविड,
ओरिसा, बंगाल.
विंध्यच्या आणि हिमालय टेकड्यांमध्ये प्रतिध्वनी आहेत आणि संगीत यमुना आणि गंगामध्ये
मिसळले आहे

सर्व भारतीयांसाठी हे आवाहन आहे - कोणतीही धार्मिक श्रद्धा बाळगणारे असले तरी. कारण सर्वांची निर्मिती देवाने केली आहे - हिंदू आणि मुस्लिम, बौद्ध आणि जैन, शीख आणि झोरास्टेरियन आणि अगदी नास्तिक देखील. सर्वांची निर्मिती देवाने केली आहे

आणि म्हणूनच सर्व देवाचे आहेत. आणि हे आवाहन भारतीय ख्रिस्ती लोकांना अधिक लागू आहे, जे ख्रिस्ताच्या नावाने ओळखले जाणारे आहेत.

परंतु आपण आपल्या राष्ट्राच्या आरोग्यासाठीच्या चार अटींचा विचार करण्यापूर्वी आपण सद्यपरिस्थिती देवाच्या न्याय आहे असे संबोधण्याची घाई करू नये. असे विचार केवळ अकाली नसून पूर्वाग्रहही असतात. आपण देवाचा शोध घेतो, त्याच्याकडे आरोग्यासाठी याचना करतो कारण आपण हे जाणतो की आपण कमकुवत आणि मर्यादित आहोत परंतु देव सर्वशक्तिमान आहे आणि जे आपण करू शकत नाही ते तो नक्कीच बरे करू शकतो.

आता आपण चार अटी पाहू:

**पहिली अट म्हणजे स्वतःला नम्र करणे.**
मानवता आज अतुलनीय यशाच्या युगात जगत आहे. हे दिवस "स्वयं निर्मित पुरुष" (आणि स्त्रिया) यांचे आहेत. " आपल्याला नशा चढली आहे आपल्या कर्तृत्वाची आणि यशाची. नम्रता आणि कृतज्ञता आता आपल्याकडे येत नाही. परंतु, जर देवाने आपल्या देशाला बरे करावे अशी आपली इच्छा असेल तर प्रथम अट नम्रता ही आहे.

गर्व आपले दोष लपवितो, म्हणूनच हा पडण्याचा एक निश्चित मार्ग आहे. नम्रता आपल्याबद्दलचे सत्य प्रकट करते, म्हणूनच ते वाढीसाठी निश्चित मार्ग आहे.

एफ. बी. मेयर एकदा म्हणाले: "मला वाटायचे की देवाची भेटवस्तू शेल्फवर एकावर एक अशा ठेवल्या आहेत; आणि आम्ही ख्रिस्ती चरित्रात जितके उंच वाढू तितके सोयीस्कर रित्या आम्ही त्यांच्यापर्यंत पोहोचू शकू. आता मला आढळले आहे की देवाच्या भेटी शेल्फवर एकाच्या खाली एक अशा आहेत. प्रश्न उंच वाढण्याचा नसून खाली वाकण्याचा आहे; त्याच्या उत्तम भेटवस्तू घेण्यासाठी आम्हाला खाली उतरावे लागेल. "

नम्रता हा स्वत: चा अपमान नाही तर ते आनंदाने देवाच्या अधीन होणे आहे - देव जो आमच्या जीवनाचा प्रभू आहे. जेव्हा आपण स्वतःला नम्र करतो तेव्हा आपण आपल्या परिस्थितीशी सामोरे जाण्यासाठी देवाच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवतो. पवित्र शास्त्रामध्ये असे म्हटले आहे की, "प्रभुसमोर नम्र व्हा, म्हणजे तो तुम्हास उच्च करील." (याकोब 4:10)

**दुसरी अट आहे की देवाच्या लोकांनी प्रार्थना केलीच पाहिजे.**
देव कधीही प्रार्थने पेक्षा अधिक दूर नाही. परंतु आपल्या दिवसाची शोकांतिका अनुत्तरीत प्रार्थना नसून, अर्पण न केलेली प्रार्थना आहे. आम्ही प्रार्थनेव्यतिरिक्त बऱ्याच गोष्टी करण्यास सक्षम आहोत. आपल्यापैकी बऱ्याच जणांनी प्रार्थना करण्याची इच्छा गमावली आहे. जर आपल्याला असे वाटत असेल की चर्च समाजावर पूर्वी इतका प्रभाव टाकत नाही कारण चर्चने प्रार्थना करणे बंद केले आहे.

तथापि, जर आज आपण आपले गुडघे टेकले तर आपण प्रार्थना करण्याच्या योग्य स्थितीत आहोत. आम्ही गुडघे टेकतो त्यावेळेस आमचा बचाव काळजीच्या ओझ्याखाली तुटण्यापासून होतो. प्रार्थना दुर्बलांना सामर्थ्य देते आणि भयभीत लोकांना धैर्य देते. कारण संताप समस्या वाढवते पण प्रार्थना देवाला उंचावते.

आज आपण इतर वेळेपेक्षा प्रार्थना करण्यास अधिक पात्र आहोत कारण आपण असहायतेच्या स्थितीत आहोत. प्रार्थना म्हणजे त्या देवाची ओळख करून घेणे जो सर्व आशीर्वादांचा स्रोत आहे. प्रार्थनेद्वारे आम्ही जाहीर करतो की आम्ही देवावर अवलंबून आहोत. कोणीतरी म्हटले आहे - जेव्हा आम्ही काम करतो तेव्हा आम्ही कार्य करतो; पण जेव्हा आम्ही प्रार्थना करतो तेव्हा देव कार्य करतो. जर आपण गुडघे टेकले तर आपण आपल्या पायावर उभे होऊ शकू.

**तिसरी अट म्हणजे देवाचा चेहरा शोधणे.**
याचा अर्थ देवाकडे परत येणे म्हणजे त्याच्या दिशे कडे वळने. आपले राष्ट्र लॉकडाउन मोडमध्ये आहे आणि आम्ही 'सामाजिक अंतर' पाळतो. परंतु देवाचा शोध घेण्यासाठी आपल्याला कोठेही किंवा कोणाकडेही जाण्याची गरज नाही. देव आपल्या जवळ आहे आणि तरीही आपण इतर गोष्टींमुळे विचलित होऊन देवाला विसरलो आहोत. यासारख्या वेळा दर्शविते आणि आवाहन करते की देवाच्या लोकांनी जीवनातल्या प्रत्येक इतर गोष्टीत मदत आणि उद्देश शोधणे थांबविले पाहिजे.

बायबल घोषित करते की देव आपला महान वैद्य आहे (निर्गम 15:26). वेटिंग रूममध्ये उभे राहून बरे होत नाही, तर आत जाऊन डॉक्टरकडे जाण्याची गरज आहे. शोध घेणे म्हणजे देवाबद्दल जाणून घेण्यापेक्षा अधिक आहे. म्हणजे, देवाला जाणून घेण्याची इच्छा असणे. आपल्या जीवनासाठी देवाची इच्छा आणि आपल्या वागणुकीसाठी त्याचे मार्गदर्शन शोधण्याचा हा एक प्रयत्न आहे. आमच्या नैतिकतेसाठी देवाचे आदर्श शोधण्याचा हा एक प्रयत्न आहे. आपण हे आचरणात आणण्यासाठी पवित्र आत्म्याच्या शक्तीचा ध्यास घेतला पाहिजे.

आपण देवाच्या चेहेऱ्याचा शोध घेत असतानाच जसा चंद्र अंधकारमय आकाशातील सूर्यावरील प्रकाश प्रतिबिंबित करतो त्याचप्रकारे आपण देवाचा प्रकाश चमकवू. मग खरोखर आपण राष्ट्रासाठी एक आशीर्वाद होऊ आणि आपले राष्ट्र जगातील लोकांना आशीर्वाद देईल.

**चौथी अट म्हणजे आपल्या दुष्ट मार्गापासून दूर जाणे.**
आजकाल आपण स्वच्छतेविषयी सजग झालो आहोत. आम्ही हात धुतो, सॅनिटायझर्स, ब्लीच मटेरियल वापरतो. आम्हाला संसर्ग होऊ नये किंवा कोणालाही किटाणूंचा वाहक होण्याची इच्छा नाही. पण आपल्या अंतःकरणाच्या स्वच्छतेचे काय?

जर आपण इच्छितो की प्रभुने आम्हाला आशीर्वादित करावे जसे तो करू शकतो आणि त्याच्या इच्छेनुसार तर आपण आपले अंतःकरण शोधले पाहिजे आणि वाईट गोष्टींपासून वळले पाहिजे. आपल्या देशातील पाखंड आणि पापाबद्दल कोणालाही पटवून देण्याची गरज नाही. जातीयवाद, दारिद्र्य, दडपशाही, शक्तीचा गैरवापर, महिला व मुलांवर शारीरिक आणि लैंगिक अत्याचार आणि बरेच काही… आमच्या आसपासची साखळी बनली आहे. ह्या सर्वांमुळे एक राष्ट्र म्हणून आमचे पाचारण पूर्ण करण्यापासून आम्हाला रोखले आहे.

केवळ आपले राष्ट्रच नाही तर आपण, जे भारतामधील चर्च आहोत, आपल्याहीं पापांमुळे खंडित होण्याची गरज आहे! बराच वेळ आम्ही देवाची कृपा सोयीस्कर घेतली आहे. आम्हाला पाहिजे आहे पश्चात्तापाचा एक हंगाम - ज्या मध्ये आपण परमेश्वरासमोर पडून आपल्या पापांची कबुली देऊ आणि त्याची क्षमा मिळवू. कारण पवित्र शास्त्र म्हणते, “जो आपले दोष झाकितो त्याचे बरे होत नाही; जो ते कबूल करून सोडून देतो त्याजवर दया होते.” (नीतिसूत्रे 28:13)

स्वतःला नम्र करणे, प्रार्थना करणे, देवाचा चेहरा शोधणे आणि आपल्या वाईट मार्गांकडे दुर्लक्ष करणे हे आवाहन फक्त आपण कोविड-19 साथीच्या आजाराला सामोरे जात आहोत त्या काळासाठीच केवळ नाही आहे. परंतु ही एक समृद्ध राष्ट्र बनविण्यासाठी देवाची योजना आहे.

या देशाच्या विकासासाठी राजकीय प्रक्रिया, शैक्षणिक फायदे, तांत्रिक प्रगती आणि नागरिकांची निःस्वार्थ सेवा या सर्व गोष्टी महत्त्वपूर्ण आहेत. परंतु हे सर्व आपल्या जगामध्ये जे वाईट आहे ते सोडवू शकत नाही. आपली भूमी बरे करण्यासाठी आपल्याला देवाची गरज आहे.

परंतु असा आक्षेप कदाचित घेतला जाईल की चांगले दिवस येतील - लोक स्वत: ला नम्र करो अथवा नाही. हे असू शकते. परंतु नैतिक नुकसान पुनर्प्राप्त करण्यापलीकडे आहे. हे नैतिक समज बुडवून, राष्ट्रीय सदसद्विवेकबुद्धी नष्ट करू शकते आणि देव देऊ इच्छित असलेले स्वर्गीय आशीर्वाद गमावू शकते.

तर मग आपण परत कसे फिरावे, आपण काय करावे, आपण सुरुवात कोठून करावी?
त्याची सुरुवात आपल्या प्रत्येकापासून होते. आपण इतर लोक देवाकडे वळण्यासाठी पाहू नये. हे माझ्यापासून सुरू होऊ द्या, आपल्यापासून सुरू होऊ द्या. आपण केवळ ऐकणारेच नव्हे तर कर्तृत्ववान होऊया.
जर आपण नम्र झाला आणि प्रार्थना केली आणि देवाच्या मुखाचा ध्यास धरला आणि आपल्या दुष्कृत्यांपासून वळालो तर देव आपल्या भूमीला आरोग्य देईल. निवड आमची आहे. ते घडण्यासाठी आम्ही किंमत मोजण्यास तयार होऊ!

देव भारताला आशीर्वाद देवो, देव चर्चला आशीर्वाद देवो, देव तुम्हाला आशीर्वाद देवो!

*(जॉयसन के. सी. यांनी थिओलॉजि व फिलॉसॉफी मध्ये पदव्युत्तर पदवी घेतली असून, ते पुणे विद्यापीठात पीएचडी चे अभ्यासक आहेत. ते दीक्षा प्राप्त पाळक आहेत मन्ना मिनिस्ट्रीचे, जी EFI ची सदस्य संस्था आहेत. आपल्या पाळकीय सेवेबरोबर, ते CLFA नामक एक युवा मूव्हमेंट चालवतात. त्याच्याशी संपर्क साधू शकताः joysermonsntalks@gmail.com)*